# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०२ /२०२५ दि.२८/०८/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत एम.एम.आर.डी.ए. कडुन मेट्रो ४ चे काम करण्यात येत असुन ठाणे घोडबंदर वाहिनीवर आनंदनगर सिग्नल येथे दि.२९/०८/२०२५ ते दि.०३/०९/२०२५ पावेतो मेट्रो ०४ रेल ट्रॅकवर सहा कोच ठेवण्याचे काम नियोजीत केलेले असुन ठाणे घोडबंदर वाहिनीवर आनंदनगर सिग्नल येथे सर्व प्रकारची वाहनांची वाहतुक सर्व्हिसरोडने वळविण्यासाठी आनंदनगर सिग्नल पुर्वी प्रवेश बंद करावा लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील प्रमाणे **वाहतुकीत बदल** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** ठाणे घोडबंदर वाहीनीवर आनंद नगर सिग्नल येथे मेट्रो ०४ रेल्वे ट्रॅकवर सहा कोच ठेवण्याचे काम करताना घोडबंदरच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहनांना **आनंदनगर सिग्नलपुर्वी 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** ठाणे घोडबंदर वाहिनी वर आनंदनगर सिग्नल येथे मेट्रो ०४ रेल पटरीवर सहा कोच ठेवण्याचे काम करतांना जड वाहने आनंदनगर सिग्नल येथुन डावे बाजुस वळण घेऊन परदेशी बाबा दर्गा येथुन युटर्न घेउन आनंदनगर सिग्नल येथुन मुख्य रस्त्यामार्गे इच्छित स्थळी जातील.<br>**ब)** ठाणे घोडबंदर वाहिनी वर आनंदनगर सिग्नल येथे मेट्रो ०४ रेल पटरीवर सहा कोच ठेवण्याचे काम करतांना हलकी डिमार्ट येथुन डावे बाजुस वळण घेऊन परदेशी बाबा दर्गा मार्गे सेवन स्क्वेअर यार्ड स्कुल, वेदांत हॉस्पीटल येथुन मुख्य रस्त्यामार्गे इच्छित स्थळी जातील. |

**सदर वाहतूक अधिसूचना दिनांक २९/०८/२०२५ रोजी पासुन ते दिनांक ०३/०९/२०२५ रोजी रात्रौ २३:५५ वा. पासुन ते सकाळी ०४:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
**पोलीस उप आयुक्त,**
**वाहतूक विभाग, ठाणे शहर**

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :-**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/- सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
**प्रत** :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/- सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :- सपोआ वाहतूक विभाग, वागळे व प्रभारी अधिकारी, कासारवडवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/- म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.